HGH INDIA® 2019

HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE

JULY 2-4, 2019 MUMBAI, INDIA

# NEWS 2

A TEXZONE Event

**Where business feels at home!**

## होम टेक्सटाईल्स ॲण्ड फर्निशिंग

# असंख्य वस्तूंचा शोध घ्या!

होम टेक्सटाईल्स आणि फर्निशिंग फॅब्रिक्स हे भारतीय गृह वस्तू बाजारपेठेतील सर्वात मोठे आणि सुस्थापित विभाग आहेत यात काही वादच नाही. मात्र, भारतातील व्यापाराचे सध्याचे अल्प प्रमाण पाहता नजीकच्या भविष्यकाळात तसेच लांबच्या पल्ल्यातही या विभागात वाढीच्या अनेक संधी दडल्या आहेत. फक्त महानगरे आणि मोठ्या शहरांवर लक्ष्य केंद्रित न करता रीटेलर्स,उत्पादक, ब्रँड्स आणि आयातदारांनी भारतभरातील आगामी १०० स्मार्ट सिटीज तसेच टीअर २ आणि टीअर ३ शहरांमध्ये असलेल्या व्यवसाय संधींचा नीट विचार करायला हवा.



मॅस्पर

मटेरिअल्स आणि कारागिरी तसेच डिझाइन्सच्या बाबतीत सर्जनशीलता आणि नाविन्यता यासाठी भारतीय होम टेक्सटाईल्स जगभरात नावाजले जाते... मग ते डिझाइन असो, प्रिंट असो, एम्ब्रॉयडरी, विणकामाच्या डिझाइन्स असोत की हस्तकला. या वैशिष्ट्यांमुळे अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, यूके, इटली, ईस्ट युरोप, जपान, ऑस्ट्रेलिया, चीन, कॅनडा, मिडल ईस्ट एशिया अशा महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये भारताने आपले एक अनोखे स्थान निर्माण केले आहे. आजघडीला, जगभरातील एकूण होम टेक्सटाईल्स निर्यातीत भारताचा वाटा नऊ टक्के आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताने प्रचंड प्रगती आणि नेतृत्वस्थान गाठले आहे. मात्र, इथल्या उत्पादकांनी स्थानिक बाजारपेठेसाठीच्या आपल्या मार्केटिंग क्षेत्रातील प्रयत्नांना मागील सात ते आठ वर्षांपूर्वीच सुरुवात केली. होम टेक्सटाइलचा वापर सध्या वार्षिक १५ ते २० टक्क्यांनी वाढत असला तरी फारच कमी ब्रँडेड उत्पादने भारतात उपलब्ध आहेत. आघाडीच्या उत्पादक आणि निर्यातदारांना भारतीय बाजारपेठेत त्यांचे होम टेक्सटाइल ब्रँड्स प्रस्थापित करता यावेत यासाठी एचजीएच इंडिया महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

खरेदीदारांच्या दृष्टिकोनातूनही एचजीएच इंडियाने देशभरातील भारतीय डिस्ट्रिब्युटर्स आणि रीटेलर्सपर्यंत अधिकाधिक ब्रँडेड वस्तू पोहोचतील यापद्धतीने आपले सोर्सिंग सुरू केले आहे.

बेड शीट्स हा होम टेक्सटाईल्स विभागातील सर्वाधिक विकला जाणारा विभाग आहे. देशभरात विकल्या जाणाऱ्या होम टेक्सटाईल्स उत्पादनांच्या स्थानिक बाजारपेठेत बेड शीट्सचा वाटा सुमारे ५० टक्के आहे. त्यानंतर कर्टन मटेरिअल्स, अपहोलस्ट्री फॅब्रिक्स, बेड कव्हर्स, कुशन कव्हर्स आणि पिलोज, दरीज, रग्ज आणि कारपेट्सचा नंबर लागतो. ब्लाइंड्सची मागणीही वाढत आहे. सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या रेडीमेड मॅट्रेसेस आणि पिलोज या उत्पादन विभागात ग्राहकांच्या मागणीत वर्षाला सुमारे १०० टक्के या दराने वाढ होत आहे.

होम टेक्सटाईल्सचा विचार करता व्हिजिटर्ससाठी एचजीएच इंडिया २०१९ हा व्यवसायाच्या दृष्टीने अनेक लाभ देणारा अनुभव असणार आहे. २०१९/२० साठीचे आगामी होम फॅशन ट्रेण्ड्स अभ्यासण्यासोबतच त्यांना बाजारपेठेत अग्रणी राहण्यासाठी अनेक नाविन्यतांची माहिती मिळेल, नव्या भारतीय आणि आंतरराष्ट्रीय सप्लायर्सची ओळख होऊ शकेल आणि



रूमर्स

**इनोव्हेशन ▪ ट्रेण्ड्स ▪ उत्पादने ▪ स्रोत ▪ संधी**

# होम टेक्सटाइल, होम डेकोर आणि गिफ्ट्स विभागाचा लेखाजोखा

स्वत:ला बाजारपेठेच्या माहितीने अद्ययावत राखता येईल.

**फर्निशिंग फॅब्रिक्स :** गेल्या वर्षभरात रीटेल सेल्समध्येही काहीशी मंदी होती. यामागे बाजारपेठेच्या बदलत्या स्वरूपाचा मोठा भाग होता. ग्राहकांच्या मागणीत घट होऊनही टीअर २ आणि टीअर ३ शहरे आणि नगरांमध्ये अनेक नव्या स्टोअर्सचा शुभारंभ झाला आणि त्यामुळे रीटेलर्समधील स्पर्धा वाढत गेली. यामुळे, फर्निशिंग फॅब्रिक्स मोठ्या कंपन्यांना आकर्षित करत आहे. भारतातील फर्निशिंग बिझनेसचे आयाम बदलत असतानाच बाजारपेठेत या विभागात अनेक संधी दडल्या असल्याचेच यातून प्रतित होते.

एचजीएच इंडिया २०१९ मध्ये पुन्हा एकदा फर्निशिंग फॅब्रिक्स हा सर्वात मोठा उत्पादन विभाग ठरणार आहे. या विभागातही मागणी वाढेल, असा उद्योग क्षेत्राचा अनुभव आहे.

डीडेकोर, डीसीटेक्स, एफ ॲण्ड एफ, लक्झर, रुमर्स, झायना, प्रेत-फॅब, केसी फॅब्रिक्स, न्यू कॅसल, वाया (यूटीएम), व्ही ॲण्ड जे, जेम कलेक्शन, रीलायबल ड्रेप्स अशा प्रसिद्ध भारतीय ब्रँड्सतर्फे २०१९/२० च्या रीटेल सीझनसाठी कर्टन्स, ड्रेपरी, अपहोल्स्ट्री आणि डेकोरेटिव्ह फॅब्रिक्समधील नवे कलेक्शन सादर केले जाणार आहे.

आयएफआय (ग्रीस), डिझायनर्स गील्ड (यूके), झिमर + रोडे (जर्मनी), कॅसामॅनस (फ्रान्स), हर्लेक्वीन (यूके), मायक्रोफायबर्स (यूएसए), सरटेक्स (टर्की) अशा नावाजलेल्या आंतरराष्ट्रीय ब्रँड्सचे नवे आधुनिक आंतरराष्ट्रीय फॅब्रिक कलेक्शनही पाहता येईल. हे ब्रँड्स थेट किंवा भारतीय डिस्ट्रिब्युशन पार्टनर्सच्या माध्यमातून यात सहभागी होत आहेत.

फर्निशिंग आणि अपहोल्स्ट्री फॅब्रिक्समधील अनेक उत्पादक आणि खासगी लेबल सप्लाइर्स सामान्य तसेच प्रीमिअम बाजारपेठेसाठी विविध प्रकारचे सोर्सिंग पर्यायही यात मांडणार आहेत.

**बेड ॲण्ड बाथ :** बेड ॲण्ड बाथ हा भारतातील एकूण रीटेल सेल्समध्ये ५० टक्के वाटा असलेला भारतीय होम टेक्सटाईल्स बाजारपेठेतील एक सर्वात मोठा विभाग आहे. या विभागाची वार्षिक १५ टक्के दराने वाढ होत आहे. यातून अनेक नव्या कंपन्या आणि नाविन्यपूर्ण उत्पादन दरवर्षी बाजारपेठेत दाखल होत आहेत. एचजीएच इंडिया २०१९ मध्ये पुन्हा एकदा हा ट्रेण्ड दिसून आला. कारण, यंदा या विभागात नव्या कंपन्यांसह ४० हून अधिक प्रदर्शकांचा समावेश आहे. बॉम्बे डाइंग, ट्रायडंट, डीडेकोर, मॅस्पर, मायक्रो कॉटन, बेला कॅसा, बोहेन्युर, डीसीटेक्स, ससॉन, बियांका, कॅप्स, मार्क-होम, फ्लोरिडा, स्टयला आणि सॉफ्टविव्ह असे आघाडीचे ब्रँड्स या प्रदर्शनात आपली


ड्युरोफ्लेक्स

नाविन्यपूर्ण उत्पादने आणि नव्या डिझाइन्स सादर करतील.तसेच मुंबई, अहमदाबाद, लुधियाना, पानिपत, जयपूर, कोइंबतूर आणि करूर येथील अनेक आघाडीचे उत्पादक भारतीय बाजारपेठेत आपल्या ब्रँड्ससह पदार्पण करणार आहेत किंवा रीटेलर्स आणि सुस्थापित ब्रँड्सना खासगी लेबल मॅन्युफॅक्चरिंग सुविधा पुरवणार आहेत.

**मॅट्रेसेस ॲण्ड पिलोज :** आरोग्यदायी, फिट आणि कार्यक्षम राहण्यासाठी योग्य दर्जाची झोप महत्त्वाची असते, हे मागील ५ ते ७ वर्षांच्या काळात भारतीय ग्राहकांना कळू लागले आहे. हे लक्षात आल्याने विविध प्रकारच्या वैयक्तिक गरजांप्रमाणे विविध प्रकारचे मटेरिअल आणि तंत्र वापरून बनवलेल्या उच्च दर्जाच्या मॅट्रेसेस आणि पिलोजची मागणी वाढत आहे.

भारतात या क्षेत्रात क्रांतीकारी मागणी आणि प्रगतीच्या अनेक संधी आहेत. प्रस्थापित कंपन्यांकडून सतत सादर केले जाणारे नवे ब्रँड्स आणि नवी रेंज यामुळे रीटेलर्स, डिस्ट्रिब्युटर्स, इन्स्टिट्यूशनल बायर्स आणि इंटेरिअर डिझायनर्सना या अत्यंत दमदार आणि वेगवान विभागाचा वेग साध्य करणे काहीसे कठीण होत आहे.

एचजीएच इंडिया २०१९मुळे व्हिजिटर्सना कर्ल-ऑन, स्प्रिंगफिट, ड्युरोफ्लेक्स, किंग कॉइल, सेंच्युरी, निलकमल आणि डॉ. बॅक यासारख्या प्रस्थापित ब्रँड्सकडून नाविन्यता आणि नव्या गोष्टी समजून घेता येतील. त्याचप्रमाणे, मेमॉयर, रीपोझ, रीलॅक्सवेल, रेमको, स्लीपमॅक्स यासारखे तुलनेने नवे


ॲना सिमोना

ब्रँड्सही विविध बाजारपेठांसाठी मॅट्रेसेस आणि पिलोजची बहुविध श्रेणी सादर करतील.

**डेकोरेटिव्ह मेडअप्स :** आपल्या घराची सजावट करण्यासाठी सुरोगय पद्धतीने डिझाइन केलेल्या मेड-अप्सची आवड भारतीय ग्राहकांमध्ये वाढते आहे. यातील रीटेल मागणी वार्षिक २० ते २५ टक्क्यांनी वाढत असल्याने रीटेलर्सनीही या वस्तूंसाठी अधिक जागा पुरवायला हवी.

कुशन्स, कुशन कव्हर्स, कर्टन्स, ब्लाइंड्स, बेड कव्हर्स, डुवेट कवर्स, क्विल्ट्स, थ्रोज, कम्फटर्स, शॅम्स, बॉल्स्टर्स, सोफा कव्हर्स, कॉर्ड्स, टेसल आणि होम टेक्सटाईल्समधील इतर डेकोरेटिव्हमधील असंख्य डिझाइन आणि उच्च दर्जाची उत्पादने बनवण्यासाठी भारत जगभरात प्रसिद्ध आहेच. आजवर फक्त आंतरराष्ट्रीय बाजारपेठांवर भर देणाऱ्या अनेक आघाडीचे एक्स्पोर्टर्सनी भारतीय देशी बाजारपेठेतील उच्च क्षमता आणि संधी जोखल्या आहेत आणि आता ते एचजीएच इंडियाच्या माध्यमातून इंडियन रीटेलर्स, इंटेरिअर डिझायनर्स यांना जागतिक दर्जाची उत्पादने पुरवत आहेत. यंदाही, व्हिजिटर्सना देशभरातील नेहमीच्या तसेच नव्या प्रदर्शकांनी मांडलेल्या अनोख्या वस्तूंची रेंज पाहता येईल.

मुंबई, दिल्ली, जयपूर, पानिपत, अहमदाबाद, सुरत, कोलकाता, कुन्नूर, करूर, चेन्नई, बेंगळुरु आणि भारताच्या अनेक भागांमधील ख्यातनाम ब्रँड्स आणि आघाडीचे एक्स्पोटर्स वरील उत्पादनांच्या नाविन्यूपूर्ण डिझाइन्सची व्यापक रेंज सादर करतील. ॲना सिमोना (टेक्स्ट्रेड), मॅस्पर, आयदम (ग्रासीम जन सेवा ट्रस्ट), लूम (शबरी इंटरनॅशनल), हाऊस ऑफ इनकास, टेक्स एन क्राफ्ट (टेक्स्स्टाइल्स), बिआंका, पॅन ओव्हरसीज, होम प्लस रीटेल असे अनेक ख्यातनाम निर्यातदारही या ट्रेड शोमधील आघाडीचे प्रदर्शक आहेत.

गोपालाज, सुखसागर आणि स्टर्लिंगतर्फे जयपूरमधील मेड-अप्सची रेंज सादर केली जाणार आहे. जयपूर मधील पारंपरिक डिझाइन्स आणि अनोखे ब्लॉक प्रिंटिंग, संगनेर प्रिंट्स, क्विल्टिंग, भरतकाम आणि हस्तकला प्रसिद्ध आहे.

**ब्लाइंड्स :** उन्हापासून संरक्षण आणि घराची सजावट अशा उद्देशाने पारंपरिक कर्टन्स आणि विंडो ड्रेपिंगला पर्याय म्हणून ब्लाइंड्सची लोकप्रियता भारतात वाढत आहे. अशात भारत आणि इतर अनेक देशांमधील २५ हून अधिक आघाडीचे ब्रँड्स एचजीएच इंडिया २०१९ मध्ये आपली व्यापक श्रेणी सादर करतील. रोलर, व्हर्टिकल, वेनेटियन


बॉंबे डाइंग


टोसो

अधिक माहितीसाठी: www.hghindia.com ■ टेलीफोन मुंबई: +९१ २२ २४२१ ४१११ ■ दिल्ली: +९१ ११ २५७१ ४१११ ■ ईमेल: info@hghindia.com

# एचजीएच इंडिया २०१९:७०० ब्रँड्स आणि उत्पादकांचा समावेश

आणि रोमन ब्लाइंड्स तसेच ब्लॅकआऊट कर्टन्स अशा उत्पादनांचा यात समावेश आहे. जपानमधील टोसो, नेदरलँड्समधील फॉरेस्ट, फ्रान्समधील सॉम्फी, युएईमधील पॅन्कोल आणि ए-ओके आणि चीनमधील झेजिआंग देशेगंलॉगा यांच्यातर्फे भारतीय रीटेलर्स, डिस्ट्रिब्युटर्स, आर्किटेक्ट्स आणि इंटेरिअर डिझायनर्ससाठी त्यांची नवीन आंतरराष्ट्रिय उत्पादने सादर करतील.

डीडेकोर या भारतातील आघाडीच्या आणि वेगाने वाढणाऱ्या ब्रँडतर्फे संपूर्णपणे नवी रेंज सादर केली आहे. त्याचप्रमाणे, एनबीटी, नोव्हा, डेको विंडो, टच ब्लाइंड्स, शेड्स, वेएन्तो आणि कझागे यासारखे भारतीय ब्रँडही त्यांच्या ब्लाइंड्समधील नवी रेंज सादर करतील. भारतीय बाजारपेठेत ब्लाइंड्सची मागणी वर्षाकाठी २५ टक्क्यांहून अधिक वेगाने वाढते आहे. ब्लाइंड आणि कर्टन मेकॅनिझममधील नाविन्यता आणि ऑटोमेशनही व्हिजिटर्सना इथे अनुभवता येईल.

**बाथ मॅट्स ॲण्ड ॲक्सेसरीज :** आरोग्य, स्वच्छता आणि लाइफस्टाइल अधिक वृद्धिंगत करण्यासाठी अधिक चांगल्या बाथरुम्सची गरज असते, याचे महत्त्व आणि जाणीव भारतीय ग्राहकांमध्ये वाढताना दिसत आहे. बाजारपेठेतील या संधींचा लाभ घेण्यासाठी २५ हून अधिक उत्पादक, ब्रँड्स, निर्यातदार आणि आयातदार बाथ मॅट्स तसेच बाथरूम स्लीपर्स, बाथ रोब्स, शॉवर कर्टन्स अशा बाथरूम ॲक्सेसरीज सादर करणार आहेत. पॅन ओव्हरसीज, रिविएरा टेक्सटाईल्स, टेक्स एन क्राफ्ट, पानिपत येथील होम फ्लोअर आणि दिल्लीतील सॅप्रोज असे भारतातील आघाडीचे निर्यातदार या उत्पादनांची आंतरराष्ट्रीय श्रेणी स्थानिक बाजारपेठेसाठी सादर करणार आहेत. तर दुसऱ्या बाजूला, ऑब्सेशन, फ्रीलान्स, डिवाइन, श्रेस्मो यासारखे ब्रँड्स त्यांच्या स्वतःच्या ब्रँडअंतर्गत या उत्पादनांची इम्पोर्टेड आणि डिझायनर श्रेणी सादर करतील.

बाथरूम ॲक्सेसरीजमधील कठीण सामानामध्ये सोप डिस्पेसर्स, सोप डिश, ब्रश होल्डर्स, टॉवेल रिंग्स, टॉयलेटरी रॅक्स ॲण्ड ट्रेज, बाथ क्लोजेट अशा उत्पादनांचा समावेश होतो. ऑब्सेशन, फ्रीलान्स, डिवाइन आणि श्रेस्मो यासारखे ब्रँड्स या उत्पादनांची इम्पोर्टेड आणि भारतीय रेंज सादर करतील.


सीईपीसी


पॅन ओव्हरसीज

**रग्स ॲण्ड कारपेट्स :** जगभरातील बाजारपेठेतील ४० टक्के वाट्यासह भारत हा हँडमेड रग्स ॲण्ड कारपेट्सचा एक सर्वात मोठा निर्यातदार देश आहे. कारपेट एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल (सीईपीसी) चौथ्यांदा आपल्या सदस्यांसाठी समूह सहभागाचे आयोजन करत आहे. सीईपीसीअंतर्गत ११ ख्यातनाम रग्स आणि कारपेट निर्यातदार भारतीय रीटेलर्स, डिस्ट्रिब्युटर्स आणि इंटेरिअर डिझायनर्ससाठी आपली उत्पादने सादर करतील. यामुळे त्यांच्याबरोबरच रीटेलर्ससाठीही नव्या संधी उपलब्ध होतील. भारतीय बाजारपेठेत या विभागाची वार्षिक ३०-३५ टक्के दराने वाढ होत आहे.

भारतात विविध प्रकारची कारपेट्स हाताने बनवली, गुंफली आणि विणली जातात. मात्र, स्थानिक वापरासाठी आपला देश निर्यात केलेल्या मशिन-मेड रग्स आणि कारपेटवर अवलंबून आहे. भारतातील निवडक आणि चोखंदळ ग्राहकांमध्ये हँडमेड रग्सची मागणी असली तरी किमतीला प्राधान्य देणाऱ्या सामान्य भारतीयांच्या बाजारपेठेत मात्र टर्की, बेल्जिअम, इराण, इजिप्त आणि चीनमधील तुलनेने स्वस्त मशिन-मेड कारपेट्स अधिक पसंत केली जातात. एचजीएच इंडिया २०१९ मध्ये ही उत्पादनेही व्हिजिटर्सना पाहता येतील. त्याचप्रमाणे भदोई, पानिपत, जयपूर, वाराणसी, दिल्ली आणि काश्मिरमधील २५ हून आघाडीचे मॅन्युफॅक्चरर्स सिल्क, वुल, कॉटन सिंथेटिक आणि रीसाइकल्ड मटेरिअल्सपासून बनवलेले, हाताने विणलेले आणि मशिन मेड कारपेट आणि रग्स, दरीज, प्रेयर मॅट्स अशी विविध उत्पादने मांडणार आहेत. कालिन, कारपेट्सबाय आरकेएस आणि ओनिक्स अशा काही आघाडीच्या प्रदर्शकांचा यात समावेश आहे.

**टेबल ॲण्ड किचन लिनन :** भारतीय घरांमधील स्वयंपाकाच्या आणि जेवणाच्या सवयी पाहता आजही टेबल ॲण्ड किचन लिनन हा भारतीय होम टेक्सटाईल्स मार्केटमधील एक छोटा हिस्सा आहे. मात्र, या विभागातील मागणी वेगाने वाढत आहे. विशेषतः पाश्चिमात्य जीवनशैलीचा प्रभाव असलेल्या तरुण, शहरी ग्राहकांमध्ये ही मागणी वाढते आहे.

एचजीएच इंडिया २०१९ मध्ये मुंबईतील बिआंका, विनमार्क आणि कुणाल एंटरप्राइजेस तसेच दिल्लीतील मॅस्पर आणि चेन्नईतील चेन्नई होमटेक्स आपल्या टेबल आणि किचन लिननसोबतच गिफ्ट पॅक्सची श्रेणी सादर करतील. त्याचप्रमाणे, जयाकृष्णा टेक्स, एअरविल होम कलेक्शन, होम प्लस रीटेल्स आणि सुपीरिअर होम फॅशन्स हे करूरमधील ब्रँड्स हँडलूम आणि पॉवरलूममधील टेबल आणि किचन लिनन रेंजमध्ये टेबल कव्हर्स,


HGH INDIA 2019
HOME DECOR GIFTS HOUSEWARE
JULY 2-4, 2019
BOMBAY EXHIBITION CENTRE, MUMBAI

ट्रेड व्हिझिटर्स!
www.hghindia.com
इथे करा ऑनलाइन रजिस्टर
२० जून २०१९ पर्यंत
आणि १०००/- रु. एंट्री फी वाचवा

अधिक माहिती आणि साह्यासाठी
कृपया संपर्क करा
अमर शर्मा
मो.: +९१ ९९ ६७६ ००२८६/
एलका अन्सारी
मो.: +९१ ९९ ३०१ ७२९७३
मुंबई फोन : +९१ (२२) २४२१ ४१११
फॅक्स : +९१ (२२) २४२१ ४११६
दिल्ली : फोन : +९१ (११) २५७१ ४१११
फॅक्स: +९१ (११) २५७१ ४११६
ई-मेल: visitors@hghindia.com


डायनिंग नॅपकिन्स, प्लेसमॅट, रर्नस, ब्रेड बास्केट, ॲप्रन्स, मिटन्स, किचन टॉवेल्स, टी कोजीज अशी अनेक उत्पादने सादर करतील.

त्याचप्रमाणे, हॉल २ आणि हॉल ३ मधील झेजिआंग पॅव्हेलियनमधील अनेक चीनी प्रदर्शक सहज वापरता आणि देखभाल करता येण्याजोग्या, लॅमिनेटेड टेक्सटाईल्स, पीव्हीसी आणि कोटेड फॅब्रिक्समधील मिटन्स, टेबल कव्हर्स, प्लेस मॅट्स, टेबल लिनन आणि किचन लिननचे प्रकार सादर करतील. यातील काही महत्त्वाच्या प्रदर्शकांमध्ये झेजिआंग झिरान हाऊसवेअर कं. लि., यिवूनिंगझिम डेली कमोडिटीज कं. लि., निंगबाव स्प्लेंडिड होम टेक्सटाईल्स कं. लि., निंगबाव हायफू एक्स्पोर्ट्स कं. लि., चांगशू लव्ह जॉय टेक्सटाईल इम्पोर्ट ॲण्ड एक्स्पोर्ट्स कं. लि. यांचा समावेश आहे.


पॅन ओव्हरसीज


...होम टेक्सटाइल्स

## २ ते ४ जुलै २०१९, बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव (पूर्व), मुंबई

# व्हिझिटर्ससाठी सुविधा

## बिझनेस सेंटर

हॉल १ मध्ये बिझनेस सेंटर उभारण्यात आले आहे. इथे प्रदर्शक आणि व्हिजिटर्सना कम्प्युटर, इंटरनेट, कागदपत्रांचे प्रिंट्स, बिझनेस कार्ड प्रिंटिंग, स्कॅनिंग, फॅक्स आणि स्टेशनरी खरेदी करणे अशा सुविधा उपलब्ध आहेत. ट्रेड शोच्या काळात (२ ते ४ जुलै २०१९) सकाळी ९ ते सायंकाळी ६.३० या काळात या सेवा सशुल्क उपलब्ध आहेत.

## कार हायर

प्रदर्शक आणि व्हिजिटर्सना, पान क्र. ५७ वरील अॅनेक्श्चर ८ मध्ये नमूद केलेल्या टॅरिफनुसार एचजीएच इंडियाच्या संपूर्ण काळात किंवा यापैकी कोणत्याही दिवशी नारायण हॉस्पिटॅलिटी सर्विसेस या अधिकृत ट्रॅव्हल एजंटकडून चालकासह विविध प्रकारच्या साध्या किंवा लक्झ्युरी कार्स भाड्यावर घेता येतील.

तुम्हाला या प्रदर्शनाच्या तिन्ही दिवशी वाहन हवे असल्यास कृपया ट्रॅव्हल एजंटला त्याची पूर्वसूचना द्या. त्यामुळे, त्याप्रमाणे तुमच्यासाठी वाहन आरक्षित ठेवले जाईल. जुलैमध्ये मुंबईत पावसाळा असतो त्यामुळे सर्वांनी, विशेषतः बाहेरगावच्या प्रदर्शकांनी प्रदर्शनाच्या संपूर्ण काळात किमान एक तरी वाहन आरक्षित करून ठेवणे योग्य राहील. अर्थात, अंतिम निर्णय तुमचाच आहे.

यासंदर्भातील सर्व माहिती एचजीएच इंडियाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे किंवा तुम्ही travel@hghindia.com इथे ईमेल करू शकता.

## कुरिअर सर्विसेस

प्रदर्शक आणि व्हिजिटर्ससाठी हॉल १ मधील व्हिझिटर रेजिस्ट्रेशन डेस्कजवळ सर्विस एरियामध्ये कुरिअर सर्विस उपलब्ध करून देण्यात आली आहे. डेझिग्नेटेड कुरिअर डेस्कच्या माध्यमातून तुम्ही कुरिअर पॅकेट्स पाठवू किंवा मिळवू शकता.

## हॉटेल अॅण्ड अकोमोडेशन्स

एचजीएच इंडिया २०१९ चे प्रदर्शन स्थळ म्हणजेच बॉम्बे एक्झिबिशन सेंटर दळणवळणास सोयीचे पडेल अशा विविध बिझनेस, लक्झ्युरी आणि परवडणाऱ्या दरातील हॉटेल्ससह एचजीएच इंडियाने दरांमध्ये सवलत मिळवली आहे. यासाठी आमच्या www.hghindia.com या वेबसाइटवर ट्रॅव्हल टॅबवर क्लिक करा. या टॅबमध्ये एचजीएच इंडिया २०१९ चे रजिस्टर्ड एक्झिबिटर्स आणि व्हिझिटर्स ट्रॅव्हल अॅण्ड स्टे लिंकवर क्लिक करून आपला लॉगइन आयडी आणि पासवर्ड वापरून हॉटेल प्रोफाइल्स, स्टार रेटिंग, अव्हिलॅबिलिटी, प्राइजेस, सर्विसेस ऑफर्ड, प्रदर्शनस्थळापासूनचे डिस्टन्स पाहू शकतात. नारायण हॉस्पिटॅलिटी सर्विसेस या एचजीएच इंडियाच्या अधिकृत ट्रॅव्हल एजंटच्या माध्यमातून तुम्ही तात्काळ आणि थेट तुमच्यासाठी हॉटेल बुक करू शकता. त्याचप्रमाणे खास सवलतीचे दर आणि इतर उपलब्ध सुविधांचाही लाभ घेऊ शकता.

यासंदर्भातील सर्व माहिती एचजीएच इंडियाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे किंवा तुम्ही hotels HYPERLINK "mailto:travel@hghindia.com "@hghindia.com इथे ईमेल करू शकता.

## लेफ्ट लगेज

प्रदर्शक आणि व्हिजिटर्सच्या सोयीसाठी एचजीएच इंडियाने हॉल १ आणि हॉल ३ मधील व्हिझिटर रेजिस्ट्रेशन डेस्कजवळ लेफ्ट लगेजची सोय केली आहे. प्रदर्शक आणि व्हिझिटर्स ट्रेड शोच्या काळात (२ ते ४ जुलै २०१९) सकाळी ९ ते सायंकाळी ७.३० या काळात ही सेवा मोफत वापरू शकतात.

## मेडिकल सर्विसेस (फर्स्ट एड)

प्रदर्शक आणि व्हिजिटर्सच्या आरोग्य आणि सुरक्षिततेला पुरेसे प्राधान्य देत एचजीएच इंडियाने प्राथमिक वैद्यकीय सुविधांसाठी फर्स्ट एडची सोय केली आहे. हॉलमधील व्हिझिटर रेजिस्ट्रेशन भागाजवळ 'फर्स्ट एड' उपलब्ध आहे. हॉल १ च्या बाहेर संपूर्ण काळात, म्हणजेच प्रदर्शन आणि उभारणी तसेच मांडणीच्या काळात (२९ जून ते ४ जुलै २०१९) अॅम्ब्युलन्स फॅसिलिटी उपलब्ध असेल.

## पार्किंग

बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये पे अॅण्ड पार्क पद्धतीने व्हिजिटर्ससाठी कार पार्किंग उपलब्ध आहे. बॉम्बे एक्झिबिशन सेंटरच्या गेट १ आणि गेट २ मधून इथे प्रवेश करता येईल. ही सुविधा थेट बॉम्बे एक्झिबिशन सेंटरतर्फे चालवली जाते. ट्रेड शो व्हिजिटर्स वेळांमध्ये पर डे पर एंट्री १०० रु. असे गाड्यांचे पार्किंग चार्जेस आहेत. बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये व्हिजिटर्ससाठी कोणत्याही प्रकारचे फ्री पार्किंग उपलब्ध नाही.

## प्रेअर रुम

जुलै २ ते ४ २०१९ या काळातील प्रदर्शनाच्या वेळेत धार्मिक प्रार्थना करू इच्छिणाऱ्या प्रदर्शक आणि व्हिजिटर्ससाठी हॉल १ आणि हॉल ३ मध्ये प्रेअर रूम तयार करण्यात आली आहे. हॉलमध्ये लावलेले साइनेज किंवा इन्फॉर्मेशन डेस्कवरून या रुमचे निश्चित स्थान माहीत करून घेता येईल.

## रेस्टोरेन्ट/कॅफेटेरियाज

सेट अप काळात म्हणजेच २९ जून ते २ जुलै २०१९ या काळात हॉल १ आणि ३ च्या बाहेरच्या बाजूला किंवा आत तसेच हॉल १ च्या बाहेर एक साधे कॅफेटेरिया सुरू करून तिथे प्रदर्शक, कॉंट्रॅक्टर्स आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी खानपानाची सोय करण्यात येईल. बॉम्बे एक्झिबिशन सेंटरचा भाग असलेल्या नेस्को हॉस्पिटॅलिटीतर्फे संपूर्ण फूड सर्विस पुरवली जाणार आहे. नेस्को रुल्सप्रमाणे एक्झिबिशन सेंटरच्या आवारात बाहेरून आणलेले खाद्यपदार्थ खाण्याची परवानगी नाही.

सेट अप तसेच ट्रेड शोच्या काळात सर्व प्रदर्शक आणि व्हिजिटर्सना आयोजकांतर्फे पिण्याचे पाणी मोफत पुरवले जाईल. बॉम्बे एक्झिबिशन सेंटरच्या कॅफेटेरिया आणि रेस्टोरेन्टमधूनही पिण्याचे पाणी विकत घेता येईल.

२ ते ४ जुलै २०१९ या ट्रेड शो डेजसाठी हॉल १, हॉल २ आणि हॉल ३ तसेच बॉम्बे एक्झिबिशन सेंटर प्रीमायसेसमध्ये (हॉलबाहेर) अनेक ठिकाणी फूड कोर्ट्स, रेस्तराँ आणि कॅफेटेरियाची सोय असेल. हॉल १च्या प्रवेशद्वारासमोर ऑर्चर्डमध्ये (ग्रेनेडच्या पुढे) आऊटडोअर कॅफेटेरिया असेल. प्रदर्शक, ट्रेड व्हिजिटर्स आणि व्हीआयपीजना हॉस्पिटॅलिटी आणि पेयपदार्थ पुरवण्यासाठी आयोजकांनी खास लाऊंजही उभारली आहेत.

## शटल बस सर्विस

प्रदर्शक आणि व्हिजिटर्सच्या सोयीसाठी एचजीएच इंडियाने ट्रेड शोचे स्थळ आणि मुंबईतील महत्त्वाची एंट्री आणि एक्झिट ठिकाणे तसेच या स्थळाच्या जवळ असणाऱ्या रेल्वे स्टेशनदरम्यान मोफत शटल बस सर्विसेस आयोजित केल्या आहेत. यात राष्ट्रीय विमानतळ, आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि सीएसएमटी (मुंबई व्ही.टी), मुंबई सेंट्रल, बोरिवली (पूर्व), गोरेगाव (पूर्व), राम मंदिर (पूर्व), अंधेरी (पूर्व), मेट्रो वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे स्टेशन आणि दादर (पूर्व) अशा महत्त्वाच्या रेल्वे स्टेशन्सचा यात समावेश आहे. विविध हॉटेल्सपासूनही एचजीएच इंडिया व्हेन्यूपर्यंत शटल बस आहे. संबंधित शेड्युल्ड पीक अप अॅण्ड ड्रॉप सेवेची माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे. मात्र, यात बदल होऊ शकतो. आमच्या www.hghindia.com या वेबसाइटवर ट्रॅव्हल, व्हिजिटर सर्विसेस आणि प्रदर्शक सर्विसेस या लिंकअंतर्गत अंतिम वेळापत्रक आणि पिक अप पॉईंट्सची माहिती मिळू शकते. इन्फॉर्मेशन डेस्क, बसेसच्या आत किंवा स्थळावरील बसमध्ये चढण्याच्या ठिकाणीही ही माहिती मिळू शकेल.

या वेबसाइटवर व्हिजिटर्स किंवा प्रदर्शक याअंतर्गत अंतिम वेळापत्रक आणि पिक अप पॉईंट्सची माहिती मिळू शकते. या दोन्ही ठिकाणी तुम्हाला 'जनरल फॅसिलिटीज' आणि 'रीचिंग द व्हेन्यू' असे सबमेन्यू दिसतील. या हेडिंग्सअंतर्गत शटल बस शोधा. इन्फॉर्मेशन डेस्क, इन्फॉर्मेशन किओस्क, बसेसच्या आत किंवा स्थळावरील बसमध्ये चढण्याच्या ठिकाणीही ही माहिती मिळू शकेल.

## ट्रॅव्हल सर्विसेस

नारायण हॉस्पिटॅलिटी सर्विसेस या एचजीएच इंडियाच्या अधिकृत ट्रॅव्हल एजंटतर्फे प्रदर्शक आणि व्हिजिटर्ससाठी ट्रॅव्हल सर्विसेसमधील सर्वसमावेशक श्रेणी उपलब्ध आहे. यात देशी आणि आंतरराष्ट्रीय एअर तिकिट्स, कार हायर, हॉटेल रीझर्व्हेशन आणि भारतातील महत्त्वाच्या पर्यटन स्थळांसाठीचे पॅकेज्ड टूर अशा सुविधांचा समावेश आहे. मुंबई शहर आणि आसपासच्या परिसरासाठी लहान टूर पॅकेजही उपलब्ध आहेत.

www.hghindia.com वरील ट्रॅव्हल विभागातून ट्रॅव्हल एजंटला संपर्क साधता येईल.

एचजीएच इंडियाने त्यांच्या ऑफिशिअल ट्रॅव्हल एजंटच्या माध्यमातून हॉल १ मध्ये ट्रॅव्हल डेस्कही ठेवला आहे. इथे प्रदर्शक आणि व्हिजिटर्सना २ ते ४ जुलै २०१९ या काळातील प्रवासासंदर्भातील सर्व सेवांची माहिती मिळू शकेल.

शेवटच्या क्षणी होणारी गर्दी आणि गैरसोय टाळण्यासाठी तुमचे हॉटेल आणि प्रवासासंदर्भातील सर्व योजनांसाठी आधीच सोय करून ठेवणे योग्य राहील.

## अम्ब्रेला सर्विस

मुंबईतील पावसाळा लक्षात घेऊन हॉल १ आणि हॉल ३ मधील व्हिजिटर रेजिस्ट्रेशन डेस्कजवळ अम्ब्रेला सर्विस डेस्कची सुविधा आहे. ट्रेड शोला भेट देणाऱ्या प्रदर्शक आणि व्हिजिटर्सना त्यांच्या छत्र्या इथे ठेवता येतील. व्हिजिटर्सना टोकन घेऊन इथे छत्री ठेवता येईल आणि जाताना ही परत घेता येईल. ट्रेड शो डेजमध्ये (२ ते ४ जुलै २०१९) सकाळी ९ ते - सायंकाळी ७.३० या वेळेत ही सुविधा मोफत उपलब्ध आहे.